www.esakal.com

# सकाळ

मुंबई । ६ डिसेंबर २००८ । पाने १६ (टुडेसह) + बालमित्र

शनिवार किंमत २ रुपये ५० पैसे



## वंध्यत्वावर मात करण्यासाठी नवे तंत्रज्ञान

मुंबई, ता. ५ : लीलावती रुग्णालयात नुकतेच आयएमएसआय तंत्रज्ञानाची नवीन सूक्ष्मदुर्बिण बसविण्यात आली आहे. त्याद्वारे डॉ. हृषिकेश पै आणि नंदिना पालशेतकर हे वंध्यत्व निवारणतज्ज्ञांना मूल हवे असलेल्या रुग्णांवर आता अधिक चांगल्या रीतीने आणि सुलभतेने उपचार करणे शक्य होणार आहे. आतापर्यंत इंट्रासायटोप्लाजमिक स्पर्म इंजेक्शन हे तंत्रज्ञान पुरुष शुक्राणूंची निवड करताना वापरले जात असे. त्याद्वारे शुक्राणू २०० पट मोठे दिसत. आता या नवीन दुर्बिणीत इंट्रासायटोप्लाजमिक मॉर्फोलॉजिकली सिलेक्टेड स्पर्म इंजेक्शन तंत्रज्ञान वापरले जात आहे. त्यात शुक्राणूंचा आकार ७२०० पट अधिक मोठा दिसतो. त्यामुळे अत्यंत चांगल्या दर्जाचे शुक्राणू स्त्री-बीजासह संयोग करण्यासाठी निवडता येतील. त्यामुळे वंध्यत्व निवारणावर अत्यंत प्रभावी उपचार करणे सोपे झाले आहे.